# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०१/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### फसवणुक

**पो.स्टे. कन्हान** :- अंतर्गत ४ कि. मी. अंतरावरील खंडाळा कन्हान पारशिवनी येथे दिनांक ०९/०७/२०२० चे ११.०० वा. ते दिनांक २०/०१/२०२२ चे १६.३० वा. दरम्यान आरोपी नामे- अमित मोरेश्वर ठाकरे, रा. प्लॉट नं. १ सर्वश्री नगर, दिघोरी नागपुर हुडकेश्वर याने खंडाळा शिवारात आपले नावाने शेती असल्याची व शेतात ले आऊट पाडुन फिर्यादी नामे- कोठीराम हरीभाउ चकोले, वय ५७ वर्ष, रा. निलज खंडाळा यांना ले आउट मधील प्लॉट नं. ६ एकुण ४५०० स्कवे. कि. २०,२५,०००/-रू. चा विक्री करून आरोपी याचे नावावर जमिन नसतांना सदर जमिनीमध्ये प्लॉट पाडुन त्यापैकी वरलि नमुद प्लॉट फिर्यादी यांना विक्री करण्याचा कारारनामा करून त्यांचे कडुन धनादेशाव्दारे रूपये १२,०००००/-रू. रोख व ११,०००/-रू. असा एकुण १२,११,०००/-रू. घेवुन फिर्यादी यांना प्लॉट विक्री करून दिला नाही. तसेच फिर्यादी याने पैसे परत मागीतले असता आरोपीने फिर्यादीस फसवणुक करण्याचे उद्देशाने त्यांच्या बॅक खात्यात पुरेशी रक्कम नसतांना फिर्यादी यांना ४,००,०००/-रू. या प्रमाणे ३ धनादेश दिले. त्यातील एक धनादेश फिर्यादी यांने स्वताच्या बॅक खात्यात जमा केला असता आरोपीच्या खात्यात पेसै नसल्याने फिर्यादीच्या खात्यात रक्कम जमा न झाल्याने आरोपीने फिर्यादीकडुन पैसे घेवुन प्लॉट खरेदी करून दिला नाही व प्लॉट ची रक्कम परत न केल्याने सदर व्यावहारात फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मेश्राम मो.न. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

**१) पो.स्टे. खापा** :- अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा वाकोडी शिवार येथे दिनांक १९/०१/२०२२ चे २२.१५ वा. दरम्यान एमएच- ३४/डब्लु- ६५२८ क्रमांकाचा मोटरसायकल स्पेलंडर प्रो चा चालक आरोपी नामे- प्रकाश रमेश पाटील वय ३५ वर्ष रा. नांदा कोराडी याने मोटरसायकलचा मागे पंकज लांजेवार रा. कामठी यास बसवुन समोरून येणाऱ्या एमएच- ३१/सीबी- २४२६ क्रमांकाच्या आयसर वाहनाला समोरून जावुन धडक दिली. या अपघातात प्रकाश पाटील हा गंभीर जखमी होवुन स्वताचे मरणास कारणीभुत ठरला. तसेच मागे बसलेला पंकज लांजेवार हा गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- रमेश ईश्वर वंजारी वय ४६ व ा रा. वार्ड नं २ दत्तनगर खापरखेडा ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ मुकुंदा लोंदे मो नं ९८५०९००७६८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापुर** :— अंतर्गत २३ कि.मी. अंतरावरील मौजा सालेभट्टी चोर येथे दिनांक २०/०१/२०२२ चे ००.१५ वा. दरम्यान आरोपी नामे— **आत्माराम ताराचंद मोरांडे (मृतक) वय ४६ वर्ष रा. कावळापेठ ता.उमरेड जि.नागपुर** हा आपले भारत बेंझ कंपनीचा दहा चक्का ट्रक क्र. एमएच— ४०/वाय— ९४१२ ने मौजा मांगरूड येथुन सांयकाळी गिट्टी भरून सालेभट्टी चोर मार्गे आपल्या ताब्यात असलेले दहा चक्का ट्रक क्र. एमएच— ४०/वाय— ९४१२ या वाहनाने जात असतांना भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सालेभट्टी चोर जवळील गतीरोधक जवळ गिट्टी भरलेला ट्रक पलटी होऊन आरोपी हा स्वताच्या मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार भगवानदास यादव पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चनगोले मो.नं. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर